3195

जा.क्र./लाशमनपा/विदुयत/ /२०२६
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
विदयुत विभाग
दि. २८/४/२०२६.

फेर निवीदा तिसरी वेळ

जहीर निवीदा/ई कोटेशन क्रमांक ८/२०२६

सर्व उत्पादक/ विदयुत ठेकेदार/सिग्नलठेकेदार/ईलेक्ट्रीकल्स/ईलेक्ट्रॉनिक्स/कॅाम्प्युटर रिपेअरिंग यांना कळविण्यात येते की, लातूर शहर महानगरपालिका व्दारा लातूर शहरातील सर्व ठिकाणचे ट्राफिक सिग्नलचे २०२६-२०२७ या वर्षाकरिता देखभाल दुरूस्ती करणे आहे. सदर कामाची जाहीर निविदा व्दारे दर मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | अंदाजपत्रक रक्कम | कोरी निविदा शुल्क | अनामत रक्कम | निविदा विक्रीचा कालावधी | निविदा स्विकारणेचा अंतिम दिनांक व वेळ | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लातूर शहर महानगर पालिका हद्दीमधील शहरातील सर्व ठिकाणचे ट्राफिक सिग्नलचे वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे. | ९५००००/- | १०००/- | १००००/- | दि.२८/०४/२६ ते दि.१४/०५/२६ (कार्यालयीन वेळेत) | दि.१४/०५/२६ कार्यालयीन वेळे पर्यंत. | वार्षीक देखभाल दुरूस्ती कालावधी |

**नियम व अटीः-**

सदरील दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीनें मागवणेत येत आहे.

तांत्रिक लिफाफा क्र. १

१.कोटेशन/निवीदा धारकांना सोबत लागणारे उत्पादक/ विदयुत ठेकेदार/सिग्नलठेकेदार/ईलेक्ट्रीकल्स/ईलेक्ट्रॉनिक्स/कॅाम्प्युटर रिपेअरिंग एंजन्सी धारकचे प्रमाणपत्र/ अदयावत अज्ञुप्ती /शॉपॲक्ट लायसन्स , पॅन कार्ड, GST Registration इपीएफ रजिष्ट्रेशन,अद्यवत व्यावसाय कर नादेय प्रमाणपत्र, सोबत जोडणे आवश्यक आहे.तसेच मनपा लातूरचे नगरसेवक सोबत फर्मचे संबंध नसले बाबत प्रमाणीत करणे अवश्यक आहे.

२. निवीदा पुस्तीकाची किंमत १०००/- रु. रोखीने व इसारा रक्कम १००००/- रू. रोखीने आथवा डीडीने असे मा. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे नावे डीडी सादर करावा अथवा या रक्कमेचा महानगरपालिकेत भरणा करुन पावती जोडावी.

३.या संदर्भात मागील पाच वर्षात किमान एक कामाचा अनुभव असलेल्या अथवा इलेक्ट्रीकल्स / ईलेक्ट्रॉनिक्स/कॅाम्प्युटर रिपेअरिंग कामाचा अनुभव असणा-यानी कामाचा तपशिल सादर करावा.

अर्थिक लिफाफा क्र. २

संबंधीत निवीदाकाराने सिग्नलचे २०२६-२७ या कालावधी करिता देखभाल दुरूस्ती मासिक दर + GST व सर्व करासहित दर्शविल्याप्रमाणे प्रपत्र- ब मध्ये सादर करावे. दर रुपये अंकात व अक्षरी नमुद करणे अवश्यक आहे. यामध्ये फरक अढळुन आल्यास अक्षरी असलेले दर विचारात घेणेत येतील.

४.निविदा/कोटेशन धारकांना करावयाचे कामाचे तपशील मनपा विदयुत विभागमध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.



Scanned with OKEN Scanner

५.नियमाप्रमाणे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून दयावा लागेल.
६.बिलाची आदाई म.न.पा.फंडातील उपलब्ध निधी उपलब्धते नुसार केली जाईल.

७. सिलबंद लिफाफ्यावर विभागाचा संदर्भ लिहावा.
८.दिलेल्या आदेशानुसार मालाचा पुरवठा/काम न केल्यास प्रती दिन ५० रू दंड आकारण्यात येईल.
९.मुदतीत न प्राप्त झालेले अथवा अटी आसलेली निविदा/ कोटेशन स्विकारले जाणार नाही.
१०. सदरिल सिग्नलची देखभाल दुरूस्ती योग्य रित्या पुर्ण करुन शहर वाहतुक पोलिस निरिक्षक यांच्या निर्देशा प्रमाणे सिग्नलची वेळ निश्चीती करून घेणेत यावी.
११. सिग्नलची देखभाल दुरूस्ती करिता लागणारे अवश्यक साहित्य त्वरित वापरून सिग्नल त्वरित चालु करून घेणे बंधनकारक राहिल.
१२. सिग्नल बंद राहिल्यास २४ तासाच्या आत चालु करणे बंधनकारक राहिल व सिग्नलची देखभाल दुरूस्ती करिता लागणारे अवश्यक साहित्य मागवुन काम करणे असल्यास ४८ तासाच्या आत चालु करणे बंधनकारक राहिल.
१३. शहर वाहतुक पोलिस निरिक्षक यांच्या निर्देशा प्रमाणे व वेळच्या आत सिग्नल चालु न केल्यास प्रती सिग्नल प्रती दिवस ५०/-रु दंड आकारणेत येईल व चालु देयका मधुन कपात करणेत येईल.
१४. शहर वाहतुक पोलीस निरीक्षक / वाहतुक पोलीस कर्मचारी यांचा दैनंदिन अहवाल सादर करणे अवश्यक राहिल.
१५. सिग्नलची देखभाल दुरूस्ती करते वेळी कंत्रटदाराकडील काम करत असलेल्या लेबर अथवा वायरमन यांचा अपघात झाल्यास कंत्रटदाराची संपुर्ण जबाबदारी राहिल.
१६. सर्व आधिकार व कोणताही वाद उदभवल्यास मा. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचा निर्णय अंतीम राहील.

**विभाग प्रमुख (विद्युत)**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

प्रत- सिस्टम मॅनेजर , महानगरपालिका,लातूर यांना मनपाचे वेब साइटवर प्रसीद्धी करणेस्तव.



Scanned with OKEN Scanner